# महाराष्ट्र शासन

क्रमांक : - जशिअ-२०१७/प्र.क्र.३२२/जल-७
ग्राम विकास व जलसंधारण विभाग,
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
दिनांक २९जून, २०१७.

प्रति,
सर्व जिल्हाधिकारी ,

विषय : जलयुक्त शिवार अभियानातंर्गत सन २०१७-१८ यावर्षी निवडलेल्या गावांमधील कृती आराखडा करताना कामाचा **प्राधान्यक्रम ठरविण्याबाबत.**

महोदय,

"टंचाईमुक्त महाराष्ट्र सन-२०१९" या कार्यक्रमातंर्गत राज्यात जलयुक्त शिवार अभियान हा कार्यक्रम सन २०१५-१६ या वर्षा पासून राबविण्यात येत असून या कार्यक्रमातंर्गत टंचाईमुक्त करण्याकरीता सन २०१५-१६ या वर्षी ६,२०२ गावे व सन २०१६-१७ या वर्षी ५,२८२ गावे निवडण्यात येऊन या गावांमध्ये मोठया प्रमाणांत कामे करण्यात आलेली आहेत. आता सन २०१७-१८ या वर्षी ५००० गावांची निवड करण्यात आली असुन, या गावांचे कृती आराखडे तयार करण्याचे काम सुरू आहे. या संदर्भात सन २०१७-१८ या वर्षापासुन अभियान अंतर्गत निवडलेल्या गावांच्या कृती आराखडयात खालील प्राधान्यक्रमानुसार कामे समाविष्ट करण्याचे निर्देश देण्यात येत आहेत.

अ) गावातील जलसंधारणाची / मृदसंधारणाची अपुर्ण /प्रगतीपथावरील कामे पुर्ण करणे

ब) यापुर्वी पुर्ण करण्यात आलेल्या कामांची प्रकल्पीय सिंचन क्षमता पुर्नस्थापित करण्याकरीता आवश्यक असलेली दुरूस्तीची / नुतनीकरणाची कामे.

क) खोल सलग समतल चर, सलग-समतल चर, कम्पाटमेंट बंडीग, ढाळीचे बांध, गॅबियन बंधारे, विहीर पुर्नभरण, शेततळी इ. क्षेत्र उपचाराची ( AREA TREATMENT ) कामे.

ड) लोकसहभाग, ग्रामपंचायत वा अशासकीय संस्था यांच्या सहभागातुन तलावातून गाळ काढणे, नाला खोलीकरण रूंदीकरण व नाल्यातील गाळ काढणे.

२. या संदर्भात असे देखील निर्देश देण्यात येत आहे की, अभियान अंतर्गत निवडण्यात आलेल्या गावांच्या कृती आराखडयाच्या एकूण रक्कमेतील **किमान** ७०% रक्कम वर नमुद करण्यात आलेल्या कामांकरीता प्रस्तावित करण्यात यावी; तसेच कृती आराखडयातील नाला उपचाराच्या कामांकरीता ( सिमेंट बंधारे, कोल्हापूरी बंधारे इत्यादी.) कमाल रक्कम आराखडयाच्या ३०% पेक्षा जास्त होणार नाही याची कृपया दक्षता घेण्यात यावी.

३. याप्रमाणे सुचना विचारात घेवुन अभियान अंतर्गत सन २०१७-१८ करीता व यापुढे निवड करण्यात येणाऱ्या गावांमधील कृती आराखडे तयार करण्यात यावेत.

( एकनाथ डवले )
सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत :- सर्व विभागीय आयुक्त.

C:\Users\vinod.wakhare\Desktop\letter to CE and Director .doc.docxकामाचे प्राधान्य.